# निसर्गरम्य कोकण सहल (२६-०५-९३ ते १-६-९३)

शेवटी एकदाचे आमचे जायचं-नाही जायचं असं होत होत आम्ही रविवार दि. २६ मे ९३ ला कोकण सहलीसाठी घरातुन पहाटे ५.१५ ला निघालो. रिक्षाने मुंबई नाक्यावरील हॉटेल किनारा इथे पोहचलो. सहल 'कोकण विकास पर्यटन' नाशिक ह्यांनी आयोजीत केली होती. किनारा हॉटेलला त्यांची १६ सिटस् ची बस व इतर पर्यटक ५.४५ ला जमायचे होते. आम्ही तिथे पोहचलो तेव्हा ना तिथं कुणी पर्यटक, ना आमची बस! मनात एकदम पाल चुकचुकली, निदान आता ही तरी आमची सहल होते की नाही. कारणही तसेच होते. ऑक्टोबर ९२ मधे 'अथर्व ट्रॅव्हल्स', पुणे ह्यांच्यामार्फत आम्ही राजस्थान सहलीला जाणार होतो पण ऐनवेळी ह्या कंपनीने सहल रद्द केली होती. त्यानंतर आम्ही जानेवारी ९३ मध्ये 'केसरी' तर्फे मे ९३ मध्ये 'काश्मीर' सहलीला जाणार होतो. पण मार्चमधेच घरच्या काही कारणांमुळे आम्ही सहलीला जायचे नाही असे ठरवले. त्यामुळे ह्यावेळी आमची सहलीच काय हा प्रश्न पडला. कंपनीचे श्री. भालेराव ह्यांना फोन लावला. त्यांनी बस येईलच असे आश्वासन दिले. १० मिनिटांनी बस आली आणि टिपीकल नाशिककर जसे ९.३० च्या नारकाला १० वाजेपर्यंत पोहचतात त्याप्रमाणे एक-एकजण साधारणतः ६.१५ पर्यंत आले. आम्ही मात्र 'साने' ५.३० वाजताच पोहचलो होतो. तसा मी वेळेबाबत नाशिककरच आहे पण आमच्या सौ. व चिरंजीव मात्र वेळेबाबत अतिशय दक्ष असतात. असो. तर आम्ही सर्व १२ जणं (ह्यात ८ बायका-मुली), आमचा सारथी अकिल शेख व गाईड निलेश गावडे असे १४ जण नाशिकहून निघालो. एकंदर ६ कुटुंब होतो, आम्ही तिघे, कुलकर्णी पती-पत्नी, देशपांडे सासू-सून, कासार बाई व त्यांच्या २ मुली भसाळे बाई एकट्या व बाळ सावंत हे पण एकटेच. हे दोघेही जेष्ठ नागरिक. प्रवास सुरू झाल्यावर हळूहळू गप्पा सुरू झाल्या. सकाळचे प्रसन्न वातावरण आणि ६ लेनसच्या नाशिक-मुंबई रा. मा. ३ चा सुंदर रस्ता, शहापूर केव्हा आले ते समजलेच नाही. पडघ्याजवळ धिंग्रा रेस्टॉरंटला सकाळची न्याहरी झाली. गाडी मग कल्याण-डोंबिवली-शीळफाटा-तळोजा मार्गे पनवेल-मार्गे मुंबई-गोवा N.H. 17 मार्गाने पेण व नंतर नागोठण्याला पोहचली. नागोठण्याला हॉटेल इंद्रप्रस्थ इथे दुपारचे जेवण घेऊन आम्ही माणगांवला पोहचलो. इथे गाडीत डिझेल भरून लगेचच ती श्रीवर्धन रस्त्याला महामार्ग सोडून वळली. नंतरचा सर्व सफर कोकणातील अंतर्गत रस्त्यांनीच झाली. म्हसळामार्गे आम्ही दुपारी ४ पर्यंत दिवेआगर येथील परवर्धन ह्यांच्या 'ॲम्बियन्स् कॉटेज' मधे पोहचलो. प्रत्येक कुटुंबास स्वतंत्र कॉटेजमधे राहण्याची व्यवस्था. दिवसभराचा प्रवास, त्यामुळे A.C. रूमसमध्ये १५-२० मिनिटे आराम करून लगेच चहासाठी सर्वजण जमलो. चहा घेऊन जवळच असलेल्या व अतिशय प्रसिध्द असणाऱ्या दिवेआगरच्या गणपतीमंदीरात पायीच पोहचलो. इथला गणपती ३॥ किलो सोन्याचा, द्रौपदी धर्मा पाटील ह्या महिलेला तिच्या सुपारीच्या बागेत एक दिवशी सापडला. बाईंनी तो गावांतील बापट ह्यांचे मंदीरात १९९७-९८ मध्ये अर्पण केला. अर्थात मागच्या वर्षीच आपल्या एकंदरच भोंगळ कारभारामुळे चोरट्यांनी ही सोन्याची मूर्ती पळवून नेली. काही दिवसांनी चोरटे सापडले पण सोनेमात्र वितळून टाकलेले. त्यामुळे फोटोत दिसणारी ही अतिशय मोहक अशी मूर्ती प्रत्यक्ष बघण्याचे आमच्या भाग्यात नव्हते. असो. भारतात अशा ज्या काही चांदी-सोन्याच्या मूर्ती-देवळं आहेत ते चोरी होण्यापूर्वी बघितलेले बरे.

दर्शन घेऊन पायीच गावांत फेरफटका झाला, नंतर तिथल्या बीचवर थोडावेळ होतो. संपूर्ण गावांत पर्यटकांच्या निवासाची अनेक ठिकाणी सोय आहे. रात्री ८ पर्यंत पुन्हा आमच्या मुक्कामी परत आलो. रात्रीचे जेवण पटवर्धनांच्या घरचे. जेवणात कोबी, कडवे वाल, खजुर लोणचे, तळणं आणि उकडीचे मोदक. निसर्गरम्य वातावरणात झकास जेवण झाल्यावर मुखशुध्दीम्हणुन खास कोकणातील हापूस आंब्यांच्या फोडी. दिवसभरच्या प्रवासाने सर्वमंडळी दमलेली. त्यामुळे थोड्याचवेळात सर्वजण आपआपल्या कॉटेजमध्ये उद्या ८ वा. आवरून तयार होण्याच्या अटीवर परतले.

सकाळी भारद्वाज आणि इतर पक्ष्यांच्या किलकिलाटामुळे जाग आली. खूपच प्रसन्न वातावरण. कॉटेज नारळ-सुपारीच्या बागेत असल्यामुळे अजुनच मोहक. आम्ही सर्वजण तयार होऊन खोबर घातलेला उपमा, चहा-कॉफी घेऊन गाडीत. प्रथम द्रौपदी पाटील बाई ह्यांच्या बागेत. तिथे त्या स्वतः होत्या. त्यांनी मूर्ती कुठे सापडली वगैरे सांगितले. आम्ही त्यांना नमस्कार केला व त्यांचा फोटोदेखील काढला. सर्वांना त्यांनी प्रसाद दिला. आम्ही जे काही पैसे दान म्हणुन दिले ते बाईंनी दानपेटीत टाकले. त्यांनी केलेल्या दानापुढे आमचे दान म्हणजे अगदीच तोकडे. त्यांचा निरोप घेऊन आम्ही पूर्णपणे लाल-माती दगडाच्या पण वैशिष्ट्यपूर्ण अशा रूपनारायण मंदीरात आलो. इथल्या मूर्तीमध्ये विष्णूचे दहा अवतार आहेत. मत्स, कासव, वराह, नृसिंह, वामन, परशुराम, राम, कृष्ण, बद्ध व कल्किया हे विष्णूचे दहा अवतार.

मंदीरातुन मग आम्ही दिवेआगरचा निरोप घेतला व गाडी श्रीवर्धनच्या दिशेने धावू लागली. रस्ता वळणाचा आणि उजवीकडे पूर्ण अरबी समुद्र. ऊन-सावल्यांच्या खेळात प्रत्येक वळणावळणावर गाडीतून उतरून अतिशय मोहक निसर्गाचा आनंद लुटावा असे वाटत होते. काही वेळानंतर 'शेकाडी' बंदरावर गाडी थांबली. मुंबई बॉम्बस्फोटांमध्ये RDX अतिरेक्यांनी सागरीमार्गाने ह्याच बंदरावरून मुंबईत आणले होते.

बंदरावरून श्रीवर्धनला पोहचलो. महाराष्ट्राच्या एका माजी मुख्यमंत्र्यांचे हे गांव. तिथुन मग आम्ही श्रीमंत पेशव्यांचे कुलदैवत असलेल्या हरीहरेश्वरला पोहचलो. अगदी समुद्रकिनारी हे सुंदर मंदीर आहे. माझी मोठी बहिण नेहमी ह्याच वर्णन करत असते. म्हणुन लगेच खिशातील भ्रमणध्वनी काढला पण उपयोग नव्हता. रेंजच नाही. खरं म्हणजे पहिल्या दिवशीच म्हसाळ्यापासुनच आमच्या भ्रमणध्वनीला रेंज नव्हती. देवळाच्यापुढे काही पायऱ्या उतरून सुंदरपण धोकादायक असा समुद्र काठ आहे. पायऱ्या उतरून त्याकाठावर उभे राहून सुंदर समुद्राच्या लाटांचा आम्ही आनंद घेतला. ह्या काठावरूनच समुद्राला भरती नसल्यास प्रदक्षिणा मारण्यासाठी पाऊलवाट आहे. भरती असल्यामुळे अर्थातच आम्ही जाऊ शकलो नाही.

मंदीरातुन बागमांडले-वेश्वी इथल्या 'शांतादुर्गा' ह्या फेरीबोटीने समुद्राच्या खाडीतुन दुसऱ्या काठावर पोहचलो. तिथुन हर्णे येथील सुंदरश्या "कड्यावरचा गणपती" मंदीरात पोहचलो. ~~फेरी बोटीने आम्हा~~ तिथुन केळकर ह्यांच्याकडे दुपारचे जेवण. जेवणात खास कोकणातील फणसाची भाजी, आमटी, श्रीखंड, तळण, वराय भाजी, ताक असं चविष्ट जेवण झालं. तिथुन हर्णे-मुरुड ह्या गावापाशी असणाऱ्या उंचटेकडीवरून समुद्र व गावांचे विलोभनीय दृश्य बघितले. तिथुन मग कर्दे-मुरुड ह्या गावांतील "सुराळवाडी" ह्या हॉटेलवर दुपारी ४॥ पर्यंत मुक्कामासाठी पोहचलो. चहा-कॉफी घेऊन समोरच असलेल्या बीचवर.

समुद्राच्या लाटांचा, बीचवरील रेतीचा, मोटरबाईक, घोडागाडी इ. चा आनंद मनमुराद लुटला. बीचवर वेळ कसा निघुन जातो हे कळतच नाही. बीचवरून पायी हॉटेलवर. सगळेजण मिळुन मग संगीतखुर्ची, डान्स, गाणी इत्याचा तास-दिडतास आनंद घेतला. रात्री जेवणात आमरस, सोलकढी इ. गावडेंनी दुसऱ्या दिवशीचा कार्यक्रम सांगितला. जेवणानंतर पुन्हा गप्पाटप्पा. सगळ्यांची वये अचूक ओळखण्याचा मला माहित झालेला नवीन खेळ.

दुसऱ्या दिवशी सकाळी सर्व आवरून सगळे नाष्ट्याला हजर. पावसाची एक बारिक सर येऊन गेलेली. आज मंगळवार – अंगारीका चतुर्थी. आदल्या दिवशीच ज्यांना उपास आहे त्यांनी गावडेंना सांगितलं होत. मी गावडेंना उद्या नाष्ट्यापर्यंत साबुदाणा खिचडी खाण्यासाठी माझा उपास आहे असं कळवलं. गावडेंनी सकाळी खिचडीच दिली होती. खिचडी, चहा घेऊन आम्ही पुढच्या प्रवासाला. दाटझाडीतल्या वळणदार आणि अरूंद रस्त्यातुन आम्ही जात होतो. गाडी प्रथम 'परशूराम भूमी' इथे थांबली. डावीकडे परशूरामाचा ६०-८० फूटी भव्य पुतळा. बाजुने समुद्र. पुतळ्याखाली ध्यानमंदीर. दर्शन घेऊन पुढे नावाभरात गुहेत असणाऱ्या चंडिकादेवीचे दर्शन घेतले. मंदीरात पुर्ण अंधार त्यामुळे मेणबत्तीच्या उजेडात देवीचे दर्शन घ्यायला मजा वाटली.

मंदीरातुन निघाल्याबरोबर समोरच सुप्रसिध्द (म्हणजे खर तर कुप्रसिध्द) दाभोळचा वीजप्रकल्प. दाभोळ-धोपावे इथल्या "सोनिया" ह्या फेरीबोटीतुन दुसऱ्या किनाऱ्यावर असणाऱ्या गुहागरमधे पोहचलो. बस स्टॅडला लागुनच असलेल्या सावरकरांकडे दुपारचे जेवण – हॉटेल वैनतेय. जेवणातल्या सीताफळ खव्याची चव अजुनही जीभेवर आहे. हॉटेलमधली स्वच्छता वाखाण्याजोगी. भांडी स्वच्छ धुवुन लख्ख सूर्यप्रकाशात वाळवलेली. गल्ल्यावर बसलेल्या गिरीजा सावरकरांना जेवण आवडल्याचा अभिप्राय दिला पण त्यांच्या चेहऱ्यावरची माशीसुध्दा हलली नाही. नंतर समोरच असलेल्या दुर्गा-व्याडेश्वराचे दर्शन. आमचे कुळदैवत- त्यामुळे अभिषेक सांगितला.

गुहागरच्या दर्शन घेऊन निरोप घेतल्यावर गाडी वेळणेश्वरला. समुद्रकाठी असणारे शंकराचे हे मंदीर. मूर्ती (पिंड) तर खुपच छान. दर्शन घेऊन पुढे थोड्याच अंतरावर प्रसिध्द असे 'हेदवी' येथील दशभुज लक्ष्मी गणेश मंदीराचे दर्शन झाले. हे मंदिर बघण्याची आम्हा दोघांना खास उत्सुकता होती. कारण १९९९ मी मारूती कार विकत घेतल्यावर कोकणचा काही भाग फिरलो होतो. रस्ते माहिती नसल्याने हेदवीला जाण्यासाठी थोडा वेगळाच रस्ता घेतला गेला. तो आत आत जात होता. रस्त्यावर कुणीही दिसत नव्हत. मी नव्यानेच कार शिकलो होतो. शेवटी हेदवी काही अंतरावर असतांना आम्ही तिकडे जाण्याचा विचार सोडून दिला होता.

उजव्या हातांमध्ये चक्र, त्रिशूल, धनुष्य, गदा आणि महाळुंग फळ तर गणपतीच्या डाव्या हातांमध्ये कमळ, पाश, नीलकमळ, रत्न व धान्यांची लोंबी. जोगळेकरांचे हे मंदीरही खूपच आवडले.

मंदीराचे दर्शन घेऊन 'नवसाळे-जयगड' येथील 'प्रियांका' फेरीबोटीने आम्ही संध्याकाळपर्यंत मालगुंडला पोहचलो. हॉटेल "दर्यासारंग" इथे आमचा मुक्काम होता. हॉटेलचा आवार बरचं मोठं, रूमसही छान होत्या. थोडावेळ आराम करून चहा घेऊन जवळच असणाऱ्या गणपतीपुळे इथे गेलो. अंगारिका चतुर्थी असल्याने मंदीरात प्रचंड गर्दी असणार ह्याची अटकळ होतीच. मंदीर काय सर्व गणपतीपुळ्याला जत्रेचे रूप होते. एस्.टी.ने ज्यादा गाड्या सोडल्या होत्या. मंदीरापासुन जवळपास १-२ किलोमीटर पर्यंत वाहनांसाठी रस्ता बंद होता. आम्ही सर्वांनी गाडीतुनच बाप्पाला नमस्कार केला आणि सरळ मालगुंडच्या समुद्रकिनारी पोहचलो. महिलामंडळाचे 'शहाळंपानं' (शहाळ्याचे पाणी) झाले. मालगुंडचा बीचही सुरेख-स्वच्छ होता. मजा करून हॉटेलवर परत आलो. आमरस, सोलकडी, वगैरे जेवण झाले. जेवणानंतर पाऊसाला सुरवात झाली. लाईट गायब. हॉटेलला जनरेटर नाही- रूम्स आमच्या A.C. पण उपयोग काय? खिडक्यांना जाळ्या नाहीं त्यामुळे उघडण्याची सोय नाही. काहीवेळाने जनरेटर सुरू झाला. रात्री वीजांचा गडगडाट लाईटची ये-जा सुरूच. मला मात्र झोप लागली. बाकी सर्व मंडळी रात्री जागेच होते.

सकाळी सर्व आटोपून, न्याहरी चहा घेऊन 'केशवसुत' यांच्या स्मारकाला भेट दिली. केशवसुतांच्या आणि मराठीतील सर्व प्रसिद्ध कवींच्या कविता वाचून बाहेर पडलो. पुढे गणपतीपुळे. आज गर्दी त्यामानाने कमी. रांग थोडीशी होतीच. अर्ध्या तासात दर्शन झाले. समोरच सुंदरसा समुद्र. मंदीरात भक्तनिवास आहे. M.T.D.C.ची पण व्यवस्था आहे. आरती स. ५, १२ व संध्याकाळी ७ ला असते.

दर्शन घेऊन आम्ही पावसला श्री. स्वरूपानंद स्वामी यांच्या मठात आलो. मठ स्वच्छ, सुंदर आहे. ध्यानमंदीरही आहे. प्रत्येकाला इच्छा असेल तर बघुन ज्ञानेश्वरीतील एक पान वाचावे असे सांगितले जाते. मठाच्या समोरच देसाईंचे दुकान आहे. तिथुन जवळच असलेल्या देसाईंकडेच जेवण. जेवणात आमरस, केळ्याच्या-वर्णांची दोनकी मिरचीची भाजी, तळण, कोथिंबीर चटणी, मटकी उसळ, ताक भात इ. मजा आली.

कोकणस्थ लोकांच्या वाढतांना हात आखडता असतो अशी टिका नेहमी होते. जेवण छान पण वाढणं हातच राखूनच. कोकणात सगळीकडे जेवणं घेतांना हा अनुभव आला. मनात त्यांच्या वाढायचे नाही असं नाही. पण एकंदरच अन्न वाया जाता कामा नये ह्याची दक्षता.

पावसच्या जेवणानंतर आमचा प्रवास विजयदुर्गाकडे. दुपारी ३॥ ला इथे पोहचलो. हा किल्ला भोजराजाने बांधलेला व नंतर शिवाजी महाराजांनी त्यात काही सुधारणा केल्या. किल्ला बघायला पूर्ण दिवस लागतो. आमच्या धावत्या भेटीत मात्र शुध्द मराठीमधुन तिथल्या गाईडने दुर्गावरील भुयार, तीन तट, मुख्य दरवाजाची रचना, किल्ल्यांचे भौगोलिक स्थान (एका बाजुस खाडी, एका बाजुने समुद्र), घोडेपागा, दरबार, धान्याची कोठारे, दारुगोळा कोठारे, पाण्याखालची भिंत, राणीचा महाल, जवळच असणारा Dumy किल्ला इ. माहिती सुंदरपणे सांगितली.

चहा घेऊन ८० कि.मी. असणाऱ्या मालवणकडे गाडी निघाली. संध्याकाळ होणाऱ्या आत मालवणला हॉटेल गजानन निवास इथे पोहचलो. हॉटेल रूम्स सुंदर. खिडकीतुन अगदीजवळच मालवणचा (म्हणजे तारकर्लीचा) बीच.

थोडसं टेकुन मंडळीपुन्हा 'मालवण शॉपिंग' ला निघाले. मला शॉपिंगचा फार कंटाळा. त्यामुळे मी मात्र हॉटेलवरच थांबलो आणि विजयदुर्गला विकत घेतलेल्या कोकण पर्यटनविषयीच्या पुस्तिकेचे वाचन करत बसलो. इतरांनी प्रथम प्रसिध्द सुवर्ण गणेश मंदीराला भेट देऊन काजु, फणसपोळी, आंबापोळी, आंबावडी, विविध लोणची, मालवणी खाजा इ. वस्तूंची खरेदी करुन परत आले.

इथले जेवण जरा वेगळं, मालवणी मसाल्यात बनवलेलं. मला विशेष आवडलं नाही पण चलता है!

आजच्या प्रवासात काही सांगायचे राहिलेच. गणपतीपुळे येथुन आम्ही प्रथम रत्नागिरीत आलो. 'थिबा पॅलेस' बघितला. तिथुन मग देवगडच्या रस्त्याने विजयदुर्गला आलो.

दुसऱ्या दिवशी (३०।५) सकाळी हॉटेलवरुन निघालो ते सिंधुदुर्ग किल्ला बघायला. किल्ला समुद्रात असल्याने बोटीने जाव लागत. महाभयंकर प्रकार आहे. शासनाने इथे तातडीने फेरीबोट करायला हवी. आपण खरंतर अशी व्यवस्था होईपर्यंत जाऊच नाही. होडीच्या क्षमतेपेक्षा जास्त लोक त्यात कोंबलेली. दुर्घटना घडल्यास कुठलीही मनुष्यहानी टाळण्याची यंत्रणा नाही. म्हणतात ना भारतदेश परमेश्वर चालवतो. कुणीही विदेशी पर्यटक असा प्रवास करणार नाही. इथे होडीत बसतांना किंवा उतरतांना सुध्दा कुणाचाही तोल जाऊन जलसमाधी मिळू शकते. पण पुन्हा 'चलता है, देख लेंगे'

असो. एकदाचे आम्ही जीव मुठीत धरून किल्ल्यावर पोहचलो. समुद्र त्या दिवशी थोडासा खवळलेलाच होता. त्यामुळे खाडीच्या मध्यभागी आमची नाव जेव्हा वेडीवाकडी डोलायची तेव्हा आमचा आपला देवावर हवाला.

किल्ला महाराजांनी १६५४ साली ४८ एकरामध्ये पूर्णवेळ मावळ्यांच्या संरक्षणात बांधलेला. हाही पूर्णपणे बघण्यास एक दिवस लागतोच. पण भालेरावांनी निवड केलेल्या किल्ल्यावरील गाईडने (वायंगणकर त्यांचे नाव) कमीवेळात मुख्य दरवाजा, भुयार, तटबंदी, त्यात अतिशय योजनापूर्वक केलेली प्रसाधनगृहाची व्यवस्था व तिथे जाण्यासाठीची जीने, दरबार, बुरूज, राणीसाठी बाग, भवानीमाता व महाराजांचे मंदीर ही सर्व स्थळे दाखवून खूपच छान माहिती दिली. किल्ल्यावरून पुन्हा बोटीने तो जीवघेणा प्रकार करून सुखरूप पोहचलो. किल्ल्यावर प्रचंड उकाडा होता.

आता आम्ही वळलो ते जवळ असणाऱ्या 'भाऊ सामंत' यांच्या 'Spice Garden' मध्ये. इथे दुपारचे जेवण. जेवणात नारळी भात! छान होता. जेवणानंतर Spice Garden ला भेट. केरळप्रमाणेच इथे सर्व मसाले (दालचिनी, लवंग, तमालपत्र), All-in-one - मसाल्याचे झाडे, ओली सुपारी, नारळ, फणस, जाम इ. झाडे बघत फेरा मारला. त्यानुनच गावांची देवता 'धुमडाई' च्या मंदीराचे दर्शन घेतले. मंदीराचा आवार शांत व प्रशस्त. १२ ज्योतिर्लिंगांचे प्रतिकपण इथे आहे.

मंदीरातुन आम्ही पुन्हा मालवणात एका काजु Factory मध्ये आलो. आपण जे काजू विनासायास खातो, ते मिळवण्याची प्रक्रिया किती किचकट आहे ते समजले. प्रथम झाडावरून काढलेली काजु भट्टीमध्ये तापवतात. नंतर त्याचे टरफल काढले जाते. त्यानंतर पुन्हा भट्टीत - आणि मग आपल्याला काजू बाजारात जसा मिळतो तसा बाहेर काढला जातो. ह्या कामासाठी मजुरांना ७ रु. कि. ह्या भावाने टरफल काढण्याची मजुरी दिली जाते. दिवसाला एक बाई १०-१२ कि. काजूंची टरफल काढते. काढलेली टरफल पण इंधनासाठी वापरतात. दोन्हीमध्ये काही तूट भरल्यास मजुरीतुन पैसे कापले जातात. कोकणी माणसं अशी ही गरीब, कष्टाळू व सोशिक.

Factory मधुन आम्ही पुन्हा हॉटेलवर आलो. थोडा आराम करून, चला घेऊन Most awaited अशा तारकर्ली येथील कर्ली नदीतील बॅकवॉटर राईड व तिचा समुद्राशी होणाऱ्या संगमा. हॉटेल अगदीच जवळ होते. त्यामुळे १० मिनिटांत मालवण - तारकर्ली - देवबाग संगम इथे पोहचलो. बॅकवॉटर राईड एक - दिडतासाची. इथे M.T.D.C च्या House Boat ची पण व्यवस्था आहे. इथे दिसणारा निसर्ग शब्दांकीत करणे मला अशक्यच. पर्यटनाचे अनुभव मी जरी लिहीत असलो तरी खरं लिहायचे नसतात, ते अनुभवायचेच असतात. एका वाक्यात सांगायचे तर पैसा वसूल. प्रत्येकाने एकदा भेट दिलीच पाहिजे अशी ही स्वर्गातील जागा.

तारकर्ली बॅकवॉटर राइड करून आम्ही परत आलो. रात्रीचे जेवण झाले, झोपी गेलो तेही संगमाचे व बॅकवॉटरचे फ्लॅश घेऊनच.

सकाळी उठून नाष्टा. आज आंबोळ्या व चटणी. मजा आली. आज दिवसभर मोठा प्रवास होता. प्रथम आम्ही "धामापूर" ह्या कुडाळ पासुन जवळच असणाऱ्या तलावावर पोहचलो. तलाव खूप सुंदर-शांत, काठावरच श्री भगवती देवीचे मंदीर. इथली दंतकथा — सर्वलोक देवीला फुलांची परडी दाखवून तलावात सोडत असतं, दुसरे दिवशी त्याच परडीत सोने-चांदी येत असतं ती देवीला दाखवून मग घरी घेऊन जायची. किती मजा! नोकरी-व्यवसाय करायलाच नको. पण एवढं कुठलं आपलं नशिब. कुणा एका माणसाने सोन्या-चांदीने भरलेली परडी देवीला अर्पण केलीच नाही, तेव्हापासुन हे सगळं बंद झालं. शेजारीच सातेरी देवीचे मंदीर. सातेरी देवीच्या मंदिरात वारुळ असतेच असे समजते.

आता आमचा परतीचा मोठा प्रवास सुरु झाला. कसाल – कणकवली – राजापुर – हातखंबा – खेड – चिपळूण – पोलादपूरमार्गे कशेडी घाटातुन मुक्कामाला महाडला थांबच होत. मुंबई-गोवा महामार्ग कसालला गाठला व वळवळणाच्या पण सुंदर अशा ह्या रस्त्याने एक एक गांवे गाठली. मध्ये हातखंब्याला हॉटेल अलंकार इथे Typical पंजाबी जेवण. खरतरं आम्ही "भाग्याच्या गावांला (खेड) इथे जेवण करणार होतो, पण वेळेप्रमाणे हातखंब्यालाच थांबलो. बाकी गेली ४-५ दिवस संपूर्ण महिलामंडळ निलेशच्याभागे आंबे कुठे विकत मिळणार ह्याची चौकशी करत होत. त्याने हातखंब्याला घ्या असे सुचवले. सगळ्यांनी आंबे विकत घेतले. नाशिकला आल्यावर सगळ्यांचा 'पोपट' झाला ही गोष्ट निराळी. असो. वाटेत सावर्डे येथे वालावलकरांनी उभारलेली देखण येथील शिवसृष्टी बघितली. अप्रतिम आहे. प्रत्येकाने बघायलाच हवी. महिलांना समाधी दर्शनासाठी साडी नेसुनच यावे.

साधारणतः संध्याकाळी ५.३० पर्यंत महाडजवळ रायगडापासुन १४ कि. अंतरावर श्री. राऊळ ह्यांच्या 'राऊळफार्मवर' मुक्कामासाठी येऊन पोहचलो. हेही फार्महाऊस सुरेख. जेवणही चांगल होत. लक्षात राहिली तांदूळाची भाकरी आणि हिरवा भात.

हो आज (३१/५) पुष्करच्या वाढदिवस. Ice-cream खाऊन साजरा करायचा होता, पण फार्महाऊसवर व्यवस्था होऊ शकली नाही. खरतरं डुरबुक केली तेव्हा त्याला १/६ पासुनच एका ट्रेनिंगला जायचे होते. त्यामुळे आमच्या पहिल्या प्लॅनप्रमाणे ३०/५ लाच तो मालवणहून ठाण्याला येणार होता - तेथुन नाशिक. पण ट्रेनिंग ३/६ पासुन सुरु करण्याची परवानगी मिळाली आणि त्यालाही सगळ्या सहलीचा विशेषतः तारकर्लीच्या आनंद लुटता आला.

दुसऱ्या (म्हणजे सहलीच्या शेवटच्या दिवशी) सर्वजण सकाळी ७ वा. आवरून फक्त चहा घेऊन गाडीत बसले. गाडीने लगेचच रायगड गाठला. रोपवेसाठी आमचा पहिला नंबर. त्याचा आनंद घेत, गार वारा घेत ५ मिनिटात रायगडावरच्या मेणा दरवाजापाशी पोहचलो. १९८६ साली ओझरच्या (HAL) शाळेत ६ वी त असतांना शाळेच्या सहलीबरोबर आलो होतो. अर्थात गड चढुन, रोपवेने नाही. आज ३० वर्षांनी तो योग पुन्हा आला. आजचा 'उपमा' चा नाश्ता आम्ही गडावरच घेतला. इतर दोन किल्ल्यांप्रमाणेच त्या गडावरही 'गायकवाड' नांवाचा आमचा गाईड. मेणा दरवाजा, पालखी दरवाजा, राण्यांचे महाल, राजांचा दिवाणखाना, कार्यालय, मनोरे, बाजारपेठ, राज्याभिषेक झाला तो दरबार, समाधी आदी दाखविले. त्याने हिरकणीवर रचलेली एका अज्ञात कवियत्रेने केलेली कविता म्हणून दाखविली. 'दातपडी' असे नांव असणाऱ्या एका वनस्पतीची माहिती सांगितली. गडावरच सगळ्यांना पुष्करच्या वाढदिवसानिमित्त Ice-cream दिले.

रोपवेने आम्ही पुन्हा खाली आलो. राऊळ फार्मवर सर्व आवरून जेवण. जेवणानंतर परतीचा प्रवास महाड-माणगांव-इंदापूर-नागोठाणे-पेण-पनवेल मार्गे नाशिक. वाटेत पनवेलच्या आधी दु. ४ ला कामत हॉटेलमध्ये चहा झाला. पडघ्याला आल्यावर गाडीत डिझेल भरलं आणि पनवेलचीच ब्रँच नाशिकजवळ उघडणाऱ्या दत्तगुरु हॉटेलवर आलो. Advocate कुलकर्णी ह्यांनी अगोदरच ठरविल्याप्रमाणे सर्वांसाठी गरम बटाटे वडे मागवले होते.

Four लेनमुळे आता गाडीने चांगलाच वेग धरला होता. गाडीत अध्यात्म, जप, गुरु आदी विषयांवर चर्चा झाली. गाडी कसारा घाट ओलांडून आली व एकदम गाडीतुन धुर यायला लागला. बऱ्याचवेळ खटपटं केल्यावर काय होतयं ते आमच्या सारथ्याने शोधलं, गाडी पुन्हा निघाली आणि रात्री ९ पर्यंत महामार्ग बस स्थानकावर पोहचली. सगळ्यांनी एकमेकांचे निरोप घेतले आणि सुंदर अशा कोकण सहलीची सांगता झाली.

पु.लं.नी कोकणाविषयी, तिथल्या माणसांविषयी बरच लिहून ठेवलयं. तसं प्रत्यक्ष बघायलाही मिळालं. पर्यटनामुळे हळूहळू कोकणची प्रगती होती आहे, पण अजुनही तिथे गरीबी आहेच. आम्ही जयगड जवळून "जैतापूर" प्रकल्पाच्या जवळून प्रवास केला. अशा प्रकल्पांमुळे कोकणच्या निसर्गावर काय परिणाम होतील ते काळच आपल्याला सांगेल.

साधारणत: १२-१४ मंदीर, ३ किल्ले, ४-५ बीचेस आणि तारकर्ली-देवबाग संगम व बॅकवॉटर, अरुंद आणि वेड्यावाकड्या वळणाचे लालेलाल रस्ते, कोकणचा 'चिरा' दगड, रोजचे खास कोकणी जेवण इ. आठवणीमात्र कायमच मनावर कोरून राहातील हे नक्की.